**।। ॐ श्री साईराम ।।**

**'साई पर्ल्स ऑफ व्हिजडम'**

**साई ज्ञानमौक्तिके**

भगवान साईबाबांच्या चरणकमलांना वंदन

भाग १४ अ

## विद्यार्थी आणि शिक्षकांबरोबर झालेल्या भगवानांच्या संभाषणांचा कालक्रम

तेलुगु सनातन सारथी/सत्यसाई पुस्तक आणि प्रकाशन संस्थेतर्फे प्रकाशित झालेल्या धार्मिक मासिकातील) मधे अंतर्भूत असलेले कालगणनेचे संदर्भ (महिने आणि काल) इथे दिलेले आहेत. मी नेहमी स्वामींबरोबर झालेली सर्व दैवी संभाषणे लिहून ठेवतो आणि तेलुगु सनातन सारथीकडे पाठवतो. म्हणून इथे नमूद केलेली कालगणना तेलुगु सनातन सारथीमधील महिन्यांच्या संदर्भाप्रमाणे आहे. मला वाटते की हे स्पष्ट झाले आहे.

तेव्हा सन २००१ पासून सुरुवात करत आहोत. पूर्ण २००२ दैवी कृपेने आपण पूर्ण केलेले आहेत. आता आपण २००१ च्या जून महिन्यापासून पुढे चालू करू.

स्वामींची प्रार्थना करून आणि इथे जमलेल्या सर्वांसाठी त्यांचे आशीर्वाद घेऊन, मी जून २००१ पासून सुरू करत आहे. आपण एकेक घटनेप्रमाणे पुढे जाऊ.

भगवानांचे विद्यार्थी आणि शिक्षक यांचेशी झालेले संवाद

## मूल्यांची होत असलेली उतरती कळा

ही एक पौराणिक कथा आहे. तुमच्यापैकी किती जणांना राजा दशरथाचा दैवी पुत्र, या कथेचा नायक असलेल्या अशा रामायणाविषयी किंवा पाच पांडव आणि शंभर कौरवांच्या महायुद्धाची कथा ज्यात आहे अशा मूळ महाभारताविषयी माहिती असेल हे मला ठाऊक नाही. पण तुम्ही ह्यापूर्वी अनेक वेळा इथे येत असल्याने, भगवानांची प्रवचने ऐकत असल्याने, तुम्हाला त्या कथांची कल्पना नाही हे म्हणणंसुद्धा माझा मूर्खपणा आहे. (हशा) मी इतका काही वाईट नाही. तेव्हा तुम्हाला महाग्रंथ रामायणाविषयी नक्कीच कल्पना असेल.

एक दिवस संध्याकाळी प्रवचन आणि मुलाखतीनंतर भगवान नेहमीच्या खुर्चीत बसले होते आणि निरुत्साही मन:स्थितीतच त्यांनी बोलावयास सुरुवात केली. ते म्हणाले, ''आज कल्पना विकृत झालेल्या आहेत, आज वागणूक अयोग्य झालेली आहे, प्रेमळपणा हरवत चालला आहे. काळ बदलला आहे. लोकांची मानसिकता आणि दृष्टिकोन निराशाजनक बनत चालला आहे. ते पूर्वीपेक्षा आमूलाग्र बदलले आहेत.'' भगवानांची हीच मूळ टीकाटिपण्णी होती.

मग त्यांनी ह्या भूमीवरचे पौराणिक पुरावे देऊन आपलं विधान मांडायला सुरूवात केली. पूर्वीच्या काळी समाजात मूल्यांची भूमिका जबरदस्त होती. माणसं मूल्यांची किंमत पाळत आणि आज मूल्यांचे अवमूल्यन होत चालले आहे.

त्यांनी रामायण त्या कथेतील राजा दशरथाच्या तीन पत्नींचा उल्लेख केला. बाबांनी सांगितल्याप्रमाणे राजाच्या तीन पत्नी नात्याने इतक्या जवळच्या झाल्या होत्या की जणू त्यांनी एकाच मातेच्या पोटी जन्म घेतला होता. त्यांच्यात बहिणींचं नातं निर्माण झालं होतं. त्यांच्यात एकमेकींच्यात कधीही चढाओढीची भावना नव्हती. त्या एकजुटीने आणि प्रेमाने राहत असत. त्यानंतर भगवानांनी रामायणातील चार भावांच्या- राम, लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न- यांच्या जन्माबद्दलची कथा सांगायला सुरूवात केली.

मी बरोबर सांगतोय ना? मी सांगतो ते तुम्हाला समजतंय ना?

राजा दशरथाला तीन विवाह करावे लागले. का? कारण त्याला, थोरल्या विवाहापासून पुत्रप्राप्ती झाली नाही. म्हणून पहिल्या पत्नीने राजाला वारस असला पाहिजे या भावनेने राजा दशरथाला अनेक वेळा दुसरा विवाह करण्याबद्दल विनंती केली. ह्या तिच्या विनंतीनुसार त्या राजाने परत विवाह केला. परंतु पुत्रप्राप्ती झाली नाही. तेव्हा दोन्ही राण्यांनी पुत्रप्राप्तीकरता पुन्हा विवाह करण्याची प्रार्थना केली आणि राजा दशरथाने तिसरा विवाह केला. अशा तऱ्हेने राजाला तीन राण्या कराव्या लागल्यया. पहिल्या पत्नीचे नाव कौसल्या, दुसरीचे सुमित्रा आणि सर्वात धाकटीचे कैकेयी– अशी त्यांची नावे होती.

अजूनही त्याला पुत्रप्राप्ती न झाल्याने तो वैफल्यग्रस्त झाला. तेव्हा त्याचे गुरु वसिष्ठ ऋषींनी त्याला एक याग करण्यास सांगितले. परमेश्वर प्रसन्न होऊन त्याला मुले होतील असा आशीर्वादही दिला.

म्हणून राजा दशरथाने आपल्या तीनही राण्यांसमवेत गुरु वसिष्ठांनी सांगितल्याप्रमाणे याग केला. अशी ही गोष्ट आहे. त्या यज्ञापासून अग्निदेवता प्रकट झाली. त्यांनी त्यांच्याबरोबर सुवर्णपात्रातून तांदुळाची खीर म्हणजेच पायस आणले होते. तुम्हाला पायस म्हणजे काय माहीत आहे का? तुमच्या शिऱ्यासारखेच असते.

मग अग्निदेव म्हणाले, ‘‘हे राजन्, तुझ्या तीनही राण्यांनी ह्या पायसाचे तीन सारखे भाग करून प्रत्येकीने आज रात्री एकेक भाग सेवन करावा. त्यामुळे त्यांना संतानप्राप्ती होईल.

या आशीर्वादानंतर अग्निदेव अंतर्धान पावले.

## श्रीरामाचा जन्म

त्यानंतर राजा दशरथाने तीन पात्रे मागवली आणि त्या पायसाचे तीन सारखे भाग केले. मग त्याने तीन राण्यांना बोलावले आणि पुत्रप्राप्तीसाठी प्रार्थनेचा विशिष्ट शब्द उच्चारत, खाली न सांडता खाण्यास सांगितले.

होय, तीनही राण्यांनी आपापले केस धुतले आणि तेव्हा काय घडलं की दुसरी पत्नी सुमित्रा ही केस धुतल्यानंतर राजवाड्याच्या सज्ज्यात गेली. तिने ते पायसाचे भांडे कठड्यावर ठेवले आणि केस वाळवू लागली. तेव्हा तिच्या मनात एक विचार चमकला, तो असा–

‘‘हे बघा, जर ज्येष्ठ राणी असलेल्या कौसल्येला पुत्र झाला की तो राजा होईल. आणि तर धाकटी राणी कैकेयीला पुत्र झाला तर विवाहप्रसंगी राजाने तिला दिलेल्या वचनाप्रमाणे तो राजा होईल. काहीही झालं तरी मी माझा हक्क गमावेन. मला मुलं झाली तर त्यांना पहिल्या किंवा तिसऱ्या राणीच्या मुलांची सेवा करावी लागेल. माझ्या मुलाला कधीही राज्यपद मिळणार नाही.’’

असा हा विचार तिच्या मनात आला आणि तेवढ्यात एक गरुड उडत आला. तेथे असलेले पायसाचे सुवर्णपात्र उचलून घेऊन उडून गेला. तेव्हा सुमित्रा घाबरून गेली. तिचे पाय थरथरायला लागले. आवाजाला कंप सुटला, ती पतीला पूर्णपणे घाबरली कारण तिने राजाच्या सांगण्याप्रमाणे पायस ग्रहण केलं नव्हतं.

अशा शिक्षेला घाबरलेली ती हळुवारपणे, प्रार्थनापूर्वक पहिली राणी कौसल्या हिच्याकडे गेली आणि तिच्याबद्दल घडलेले सारं काही तिला नम्रपणे सांगितलं. तसंच सर्वांत धाकटी राणी कैकेयी हिलाही सर्व काही सांगितलं.

‘‘हे पहा, तुमच्याजवळ पायस असलेलं सुवर्णपात्र आहे. माझं सुवर्णपात्र एक गरूड उडत येऊन घेऊन उडून गेला. आता माझं काय होणार ते मला कळत नाही. राजे दशरथ मला काय दंड करतील ते मला माहीत नाही. मी फार घाबरले आहे. माझ्या बहिणरंनी मला मदत करावी अशी विनंती आहे.

स्वाभाविकपणे त्या दोघींना तिची दया आली. प्रथम पत्नी म्हणाली, ‘‘चिंता करू नकोस. मी माझ्यातला अर्धा भाग तुला देईन. घाबरू नकोस. दुसरे सुवर्णपात्र घेऊन ये. मी तुला माझ्या वाट्यातला अर्धा भाग देईन.’’

त्याचप्रमाणे धाकटी राणी कैकेयी म्हणाली, ‘‘चिंता करू नकोस. मी माझ्या वाट्यातला अर्धा भाग

देईन.''

अशा प्रकारे मधल्या राणीला, सुमित्राला– पहिल्या राणीच्या भागातील अर्धे पायस कौसल्येकडून मिळाले आणि तिसरी राणी कैकेयी हिच्याकडूनही अर्धा पायसाचा भाग मिळाला. त्या रात्री तिघींनीही पूजा आणि प्रार्थना केली आणि आदेशाप्रमाणे पायसाचे ग्रहण केले.

साहजिकच त्या तिघींना, अग्निदेवाच्या कृपेनुसार आणि धार्मिक कार्याचे फळ म्हणून पुत्रप्राप्ती झाली. प्रथम पत्नी कौसल्या, हिने रामचंद्राला जन्म दिला. सर्वात धाकटी कैकेयी हिने भरताला जन्म दिला तर मधली पत्नी सुमित्रा हिने जुळ्यांना जन्म दिला. एक लक्ष्मण आणि दुसरा शत्रुघ्न. जुळी अपत्ये जन्माला येण्याचे कारण असे होते की, तिला पायसाचा अर्धा वाटा कौसल्येकडून आणि पायसाचा दुसरा अर्धा वाटा कैकेयीकडून मिळाला होता म्हणून तिने जुळ्यांना जन्म दिला होता.

## दैवी योजना

आणि बाबांनी हे सांगून स्पष्ट केलं की, ''लक्षात घ्या, ही दैवी योजना आहे. सुमित्रेच्या दोन पुत्रांपैकी एक लक्ष्मण हा नेहमी रामाबरोबरच राहायचा आणि दुसरा शत्रुघ्न हा कायम भरताबरोबर असायचा. कौशल्येकडून मिळालेला अर्धा भाग लक्ष्मणाच्या जन्माने फलित झाला म्हणून लक्ष्मण नेहमी रामाच्या सान्निध्यात असायचा. कैकेयीकडून जो अर्धा भाग मिळाला, तो शत्रुघ्नाच्या जन्मासाठी जबाबदार ठरला. तो त्याचा सर्व वेळ भरताच्या बरोबर व्यतीत करत असे.''

सुमित्रा इतकी सुदैवी होती की तिचे दोन्ही पुत्र त्यांच्या भावांच्या सेवेत राहिले. भगवानांनी असंही स्पष्ट करून म्हटलं, ''तुम्हाला असे प्रेम दिसून येईल का, जे इतक्या जवळकीचं, सहानुभूतीचं आणि राण्यांमधील समंजसपणाचं होतं. त्या तिघीही राजपत्नी होत्या. त्या कधीही एकमेकींशी भांडल्या नाहीत. त्या पूर्णत: एकोप्याने आणि अगदी मिळून मिसळून राहिल्या.

***